वर्ष १० वे विशेष अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि.०३ सप्टेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# दिव्य वार्ता

## आजचा दिवस मराठा समाजासाठी ऐतिहासिक आहे परंतु या जीआर नुसार जो पर्यंत मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळत नाहीत तो पर्यंत आमची लढाई संपलेली नाही- गणेश बजगुडे पाटील

बीड । दिव्य न्युज

गेली चार दशकापासुनची मराठा आरक्षणाची लढाई असुन विशेषतः मराठवाड्यातील मराठा समाजासाठी मराठवाडा गॅजेटरची अंमलबजावणी व्हावी अशी मागणी आम्हा सर्वांची होती. आज




मनोज दादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनात या मागणीचा जी आर निघालेला असुन ते अभिनंदनीय आहे. परंतु लबाडाचं अवतन जेवल्याशिवाय खरं नाही त्याप्रमाणे जो पर्यंत या जी आर नुसार मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळत नाहीत तो पर्यंत आमची लढाई संपलेली नाही. आम्ही देखील २००४ पासुन गेली वीसवर्षां मराठा कुणबी एकच असुन मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश करावा या मागणीसाठी अनेक आंदोलने केली काठ्या लाठ्या जेल ही भोगले, शासन दरबारी आजपर्यंत आरक्षणाची मागणी वेगवेगळ्या माध्यमातून लावुन धरण्याचे काम केले.


# बीड शहर लवकरच रेल्वेच्या नकाशावर येणार, कधी सुरु होणार; अजित पवारांनी दिली महत्त्वाची माहिती

बीड । दिव्य न्युज

बीड शहर लवकरच रेल्वेच्या नकाशावर येणार असून, मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडी सुरू करण्यात येणार आहे. यामुळे अनेक वर्षापासूनचे बीडवासीयांचे रेल्वेसेवेचे स्वप्न पूर्ण होणार आहे. येत्या १७ सप्टेंबर रोजी बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगह येथे झालेल्या बैठकीत घेण्यात आला. उर्वरित बीड ते परळी वैजनाथ या रेल्वे मार्गातील अडथळे दूर करून गतीने काम पूर्ण करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.






## मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनी बीडमध्ये धावणार रेल्वे

बीड : बीड शहर लवकरच रेल्वेच्या नकाशावर दाखल होणार असून मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त १७ सप्टेंबर रोजी बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे बीडकरांचे अनेक दशकांचे रेल्वेसेवेचे स्वप्न पूर्णत्वास जाणार आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथिगृहात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीस महापारेषण कंपनीचे महाव्यवस्थापक संजीव कुमार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव दशपुते, वित्त विभागाच्या सचिव (वित्तीय सुधारणा) शैला ए, रेल्वे अधिकारी तसेच जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार यांनी बीड ते परळी वैजनाथ रेल्वे मार्गावरील प्रलंबित भूसंपादनाची प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे निर्देश दिले. राज्य सरकारच्या हिस्स्यातील १५० कोटी रुपये तत्काळ अदा करावेत तसेच उर्वरित १५० कोटींची तरतूद करावी, असेही त्यांनी सांगितले. रेल्वेने दिलेल्या निधीच्या उपयोगिता प्रमाणपत्राची कार्यवाही करण्यावरही त्यांनी भर दिला.

एकूण लांबी : २६१.२५ किमी

भूसंपादन : १८२२.१६८ हेक्टर

रेल्वे खालील पूल : १३०

रेल्वे वरील पूल : ६५

मोठे पूल : ६५

छोटे पूल : ३०२

प्रकल्प किंमत : ४८०५.१७ कोटी

हिस्सा : केंद्र व राज्य सरकार प्रत्येकी ५०% (२४०२.५९ कोटी)



या रेल्वे मार्गाच्या कामाला गती मिळाल्यामुळे बीड जिल्ह्यातील नागरिकांना थेट रेल्वेसेवेचा लाभ मिळणार असून या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल.



दिव्य वार्ता

अमळनेर ते बीड रेल्वेमार्गाचे काम पूर्ण; पंतप्रधानांच्या हस्ते १७ ला लोकार्पण

बीड-अहमदनगर सेवा सुरू करण्याचा मार्ग होणार मोकळा, २३ स्थानके होणार

उद्योग वाढल्यास रोजगार मिळेल

रेल्वे मार्गामुळे कृषी उत्पादनांची, विशेषतः ऊस आणि कापसाची वाहतूक सुलभ होईल, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. उद्योग वाढीमुळे रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील.

आष्टी । दिव्य न्युज

अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्गाच्या अमळनेर-बीड या टप्प्यातील रेल्वेमार्गाचे उद्घाटन १७ सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन प्रणालीद्वारे होणार आहे. यामुळे बीड ते नगरपर्यंतचा रेल्वे मार्ग पूर्ण होऊन या मार्गावर रेल्वेसेवा सुरु करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. बीड जिल्ह्यासाठी महत्त्वाचा क्षण असणार आहे. मध्य रेल्वे क्षेत्रांतर्गत अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ या मार्गावर २६१.२५ किमी लांबीचा ब्रॉडगेज लाइन प्रकल्प तयार केला जात आहे. हा प्रकल्प अहिल्यानगर जिल्ह्याला बीड आणि परळी वैजनाथशी जोडेल. या विभागात एकूण २३ नवीन रेल्वे स्थानके असतील. त्यापैकी काही बांधली गेली आहेत आणि काही अजूनही बांधली जात आहेत. या प्रकल्पाचा खर्च ४,९५८ कोटी आहे.

२०२४ ला बीडमध्ये प्रत्यक्ष रेल्वे धावेल

भूसंपादनातील अडथळा दूर झाल्यास दोन महिन्यात अंमळनेरपर्यंत रेल्वे धावेल

रेल्वे मार्गाचे भूसंपादन पूर्ण आगामी वर्षात रेल्वे धावणार

खासदार बजरंग बप्पाच्या हायस्पीड पाठपुराव्याने रेल्वे बीडच्या वेशी पर्यंत

नवीन रेल्वे, राष्ट्रीय महामार्गाच्या कामांना गती द्या

लवकरच मार्ग पूर्ण होईल

नगर-बीड-परळी नवीन लाइन-सीआरने एप्रिल २०२३ पासून आजपर्यंत १४७.७७ किमी मल्टिट्रॅकिंग पूर्ण केली आहे. आता लवकरच नगर ते परळी रेल्वे मार्ग पूर्ण होणार असल्याचे दिसून येत आहे.

आतापर्यंत १३३.३ किमीचे कामे झाले पूर्ण

२३ सप्टेंबर २०२२ रोजी ६६.१८ किमीचा मार्ग पूर्ण होऊन अहिल्यानगर ते आष्टी फेरीही सुरू झाली होती. विघनवाडी ते बीड हा ६७.१२ किमीचा रेल्वे मार्ग पूर्ण झाला आहे. या वर्षाअखेर अहिल्यानगर ते बीडपर्यंत रेल्वे धावणार आहे. २६१.२५ पैकी १३३.३ किमीचे काम पूर्ण झाले आहे.

आष्टी-अहमदनगर-अमळनेर नियमित फेरी सुरू असून आष्टी स्थानकावर घेतलेले छायाचित्र

विकासाला मिळणार चालना

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिवस हा १७ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. आता या दिवशीच पंतप्रधान मोदी हे ७५ व्या वाढदिवशी या महत्त्वाच्या रेल्वेमार्गाचे उद्घाटन करतील. नवीन रेल्वेमार्गामुळे मराठवाड्यात व्यवसाय, उद्योग आणि रोजगाराच्या संधी वाढतील. चांगल्या वाहतूक सुविधांमुळे शिक्षण आणि आरोग्यसेवा सुलभ होतील. हा प्रकल्प संपूर्ण प्रदेशाच्या सामाजिक-आर्थिक विकासात एक मैलाचा दगड ठरेल.

02 Sep 2025 - Page 2 | www.divyawarta.com
Powered by softisky.com


बीड ते परळी वैजनाथ रेल्वे मार्गाच्या भूसंपादनाचे प्रलंबित प्रकरणे बीड जिल्हा प्रशासनाने तातडीने निकाली काढून आवश्यक जमीन उपलब्ध करून द्यावी. या रेल्वे मार्गासाठी राज्य शासनाच्या हिस्स्याची रक्कम तातडीने अदा करण्यात यावी. अर्थसंकल्पात मंजूर १५० कोटी रुपये देण्यात यावे. उर्वरित १५० कोटी रुपयांची तरतूद करावी. रेल्वेने आतापर्यंत दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी, असेही अजित पवार म्हणाले.

**असा आहे अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्ग**

रेल्वे मार्गाची एकूण लांबी २६१.२५ किलोमीटर, जमिनीचे एकूण भूसंपादन १८२२.१६८ हेक्टर, रेल्वे खालील एकूण पूल १३०, रेल्वे वरील पूल ६५, मोठ्या पुलांची संख्या ६५, छोटे पूल ३०२. द्वितीय प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची एकूण किंमत ४८०५.१७ कोटी, प्रकल्पाच्या समप्रमाणात ५०:५० टक्के हिस्सा नुसार केंद्र व राज्य शासनाचा प्रत्येकी हिस्सा २४०२.५९ कोटी आदी.

दरम्यान, फलटण ते लोणंद या रेल्वे मार्गाचे काम करावे. बारामती रेल्वे स्थानकाच्या कामाला रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेटी द्याव्या. तसेच कामाला गती देऊन पुढील काळात सुसज्ज रेल्वे स्थानक प्रवाशांच्या सेवेसाठी उपलब्ध करून द्यावे, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

## शब्बीर अन्सारी यांची भेट





आज जालना मे ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष हाजी शब्बीर अन्सारी साहब यांची भेट घेतली ते गेले काही दिवसापासून आजारी असून त्यांचा मुंबईच्या टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहे आज जालना मध्ये भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यात आली यावेळी बीड नगरपालिकेचे माजी सभापती इलीयस टेलर ओबीसी ऑर्गनायझेशनचे राज्य सचिवहाजी रफिक बागवान बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे इरफान सेट कुरेशी, अल्ला से दुवा है के वो शब्बीर अन्सारी साहब को सेहत दे उनके उमर मे बरकत दे आमीन ...

## कामाची चौकशी केल्या शिवाय देयक अदा करू नये

पैठण । दिव्य न्युज

पैठण शहरातील मार्केट कमिटी ते वेअर हाऊस शिवनगर नारळा सिमेंट रस्ता कामाची उच्चस्तरीय थर्डपार्टी चौकशी केल्याशिवाय देयक अदा न करने, पैठण शहरामध्ये मार्केट कमिटी ते वेअर हाऊस शिवनगर नारळा येथील रस्त्याचे सिनेंट क्रॉंक्रीटीकरणाचे काम आपल्या कार्यालयामार्फत करण्यात आलेले आहे. परंतु सदरील काम हे संबंधित ठेकेदार व अभियंता यांनी आर्थिक संगणमत करत सदरील कामामध्ये कोणतीही गुणवत्ता न ठेवता निव्वळ थातूर मातूर पद्धतीने काम करण्यात आलेले आहे. सदरील काम हे अंदाजपत्रकानुसार होणे आपेक्षित होते, परंतु अंदाजपत्रकातील कोणतेही निकष संबंधित ठेकेदार व अभियंता यांनी पाळलेले नाही व शासनाच्या निधीचा मोठ्या प्रमाणात अपव्यय व भ्रष्टाचार केलेला आहे. परिणामी ज्या हेतुने शासनाने निधी दिलेला असतो, तो हेतु साध्य झालेला नाही. उलट संबंधित ठेकेदार व अभियंता यांनी आपले स्वतःचे खिसे भरलेले आहे असेही म्हटलं आहे. सदरील काम करतेवेळी अंदाजपत्रकानुसार मुरुम, सोलींग, टाकणे व रोडरोलरने दबाई करणे, पाणी मारणे, आपेक्षित होते व जुना रस्ता न खोदता त्याच रस्त्यावर थातूर मातूर पद्धतीने काम केलेले आहे. परिणामी सदरील रस्त्याची गुणवत्ता शुन्य दिसून येत आहे. ही चौकशी होणे गरजेचे आहे. करिता आपणास विनंती की, सदरील कामाची थर्ड पार्टी चौकशी केल्याशिवाय व कामाची गुणवत्ता तपासल्याशिवाय सदरील कामाचे देयक अदा करण्यात येऊ नये, अन्यथा मला नाईलाजास्तव आपल्या नगर परिषद कार्यालयासमोर आंदोलन व अमरण उपोषण करण्यात येईल, कृपया याची नोंद घ्यावी असे शिवसेना उबाठाचे पैठण उपशहर अध्यक्ष कल्याण मगरे यांनी तसे नमूद केले आहे.

## मराठा आरक्षणाच्या मागण्या मान्य करताच वडवणीत दिवाळी साजरी



वडवणी । दिव्य न्युज (शेख शरीफ)

आनेक वर्षे झाले मराठा आरक्षण मिळवण्यासाठी संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी आपल्या कुटुंबाची व जीवाची परवा न करता प्राणांतीक उपोषण केली.गेली २९ ऑगस्ट पासुन मुंबई येथे अन्न पाणी त्याग करत ऊपोषण सुरु केले.संपूर्ण मुंबई जाम केली.सरकारला ना इलाजास्तव मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मागण्या पूर्ण कराव्या लागल्या सरकारने मराठा आरक्षणाच्या मागण्या मान्य करताच वडवणी शहरासह ग्रामीण भागातील समाज बांधवांनी गुलालाची उधळण करत फटाक्यांची आतिषबाजी करत दिवाळी साजरी केली. गोरगरीब मराठा समाजाला हक्काचे ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील हे गेले अनेक वर्षापासून आपल्या कुटुंबाची व जीवाची परवाना करता प्राणांतिक उपोषण केली.त्यांच्या आरक्षणाच्या लढ्याला समाजबांधवांनी मोठा प्रतिसाद देत त्यांच्या मागे मोठी ताकद निर्माण केली.गेली २७ ऑगस्ट पासून चलो मुंबई मोर्चाचा नारादेत लाखोंच्या जनसामुदाय सोबत घेत आझाद मैदान येथे शुक्रवार दि २९ ऑगस्ट पासून अन्नपाणी त्याग करत उपोषण सुरू केले.जिकडे तिकडे मोठ्या प्रमाणात सर्वत्र मराठा बांधवांची गर्दी झाल्याने मुंबई चे जनजीवन विस्कळीत होऊन मुंबई संपूर्ण ठप्प झाली होती.सरकारला न इलाजास्तव संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मागण्या पूर्ण कराव्या लागल्या मराठा समाजाच्या मागण्याचा निर्णय घोषित होताच वडवणी तालुक्यासह ग्रामीण भागात फटाक्यांच्या आतिषबाजी तोफांची सलामी देत गुलालाची उधळण करत, मनोज दादा जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है,छत्रपती शिवाजी महाराज की जय,जय जिजाऊ जय शिवराय,लढेंगे जितेंगे हम सब जरांगे, एकच पर्व ओबीसी सर्व, ओबीसीचा नेता कैसा हो जरांगे पाटील जैसा हो, जरांगे पाटलाचा बालेकिल्ला बीड जिल्हा बीड जिल्हा अदी घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

## मुंबईहुन परतलेल्या आंदोलकांचा लिंबागणेशमध्ये जल्लोष ; आतषबाजी, गुलालांची उधळण ; जरांगे पाटलांच्या आंदोलनाला यश-डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश । दिव्य न्युज

मुंबईतील आझाद मैदानावर मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लढा देणारे संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील अखेर विजयी झाले. सरकारने मागण्या मान्य केल्यानंतर मराठा समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, उपाशीपोटी आंदोलनात सहभागी झालेल्या मराठा सेवकांनी विजयाचा गुलाल उधळत गावी परतण्याचा आनंद व्यक्त केला.

बुधवारी मुंबईहून परतलेल्या आंदोलकांच्या स्वागतासाठी लिंबागणेशच्या मुख्य चौकात गावकऱ्यांनी आतषबाजी, गुलालांची उधळण करत जल्लोष साजरा केला. जरांगे पाटलांचे फलक डोक्यावर घेऊन, गाणी वाजवत, नाचगाणी करत ग्रामस्थांनी आनंदोत्सव केला.




लिंबागणेश पंचक्रोशीतील लिंबागणेश, मुळुकवाडी, सोमनाथवाडी, पोखरी (घाट), बेलगाव, मसेवाडी, पिंपरनई, अंजनवती, मेंगडेवाडी व महाजनवाडी येथील मराठा सेवकांनी मुंबईतील आंदोलनाला हजेरी लावली होती. आझाद मैदान परिसरातील हॉटेल, दुकाने बंद झाल्यामुळे आलेली गैरसोय लक्षात घेऊन या गावांतून मोठ्या प्रमाणावर खाण्याचे साहित्य व पिण्याच्या पाण्याची रसद मुंबईत पोहोचवण्यात आली होती.आंदोलकांची पहिल्या दिवशी उपासमार झाल्याने ग्रामस्थांमध्ये सरकार विरोधात तिव्र रोष होता.महिलांच्या भावना अनावर झाल्या होत्या त्यातुन त्यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली होती. सोमवारी लिंबागणेश येथे रास्ता रोको आंदोलनही करण्यात आले होते. अखेरच्या विजयामुळे आता मराठा समाजाला शैक्षणिक व नोकरीच्या संधींचा लाभ मिळेल, असा विश्वास मराठा सेवक डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केला. जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतल्याने सर्वत्र समाधानाचे वातावरण असून फटाके फोडून उत्सवाचा आनंद व्यक्त होत आहे.

## अमीर बाबा दर्गा चे अनेक वर्ष सेवा करणारे खिरणाबाई चव्हाण यांचे दु:खद निधन

चकलंबा । दिव्य न्युज



गेवराई तालुक्यातील चकलंबा येथील हजरत अमीर शहा कादरी दर्गा यांची सेवा करणारी खिरनाबाई चव्हाण यांचे दि.३१ ऑगस्ट २०२५ रविवार रोजी दुःखद निधन झाले.त्यांनी वीस ते पंचवीस वर्ष मनोभावाने दर्गा ची सेवा केली. खिरणाबाई यांना चकलांबा येथील आणि दर्गा ला येणारे सर्व भाविक भक्त हे आत्या मानत असे.तसेच, त्या सर्वांच्या आत्या होत्या. त्यांना सर्वजण फुप्पु असं म्हणत असे.कधीही कुणाला रागवत नसत अतिशय प्रेमळ पणाने आणि सर्वांशी मनमिळावु स्वभावाने सर्वांशी त्या राहत असे. त्यांच्या जाण्याने चकलांबा आणि परिसरात हळहळ व्यक्त करीत आहेत.त्यांची निधनाची वार्ता समजताच अनेकांना धक्काच बसला त्यांच्या अंत्यविधीला मोठा जनसमुदाय उपस्थित होता.त्यांच्या पश्चात दोन मुले,सुना,नातवंड असा त्यांचा मोठा परिवार आहे .

# बीडचे मराठे उपाशीपोटी मुंबईला गेले, पण विजयाचा गुलाल लावूनच परतले

## मराठा आरक्षणासंदर्भातील आंदोलनाला यश : फटाके फोडत, पेढे वाटून जिल्हाभरात जल्लोष

### मुंबईतील आंदोलकांसाठी पाठविली शिदोरी

२७ ऑगस्ट रोजी मुंबईच्या दिशेने गेलेले मराठा आंदोलकांचे मुंबईत जेवणाअभावी हाल होत असल्याचे समजले. त्यानंतर, बीड जिल्ह्यातील अनेकांनी पुढे येत भाकरी, चपाती, लोणचे, ठेचा, चटणी, बुंदी, चिवडा, पाणी बॉटल असे विविध खाण्याचे पदार्थ वाहनांमधून मुंबईला पाठविले होते. यामुळे लोकांची तहान-भूक भागली होती. आता हेच आंदोलक विजयाचा गुलाल उधळून बीड जिल्ह्यात परतणार आहेत.

### बीड जिल्ह्यातील स्वयंसेवकांचा नियोजनात सहभाग

बीड जिल्ह्यातील अनेक तरुणांनी स्वयंसेवक म्हणून या आंदोलनात काम केले. वाहनांची कोंडी सोडविणे, जेवणाची, राहण्याच्या व्यवस्था करण्यासह त्याची माहिती देणे, जरांगे पाटील यांच्या आजूबाजूला थांबणे, असे अनेक जबाबदारीचे काम तरुणांनी केले.

### महिला, तरुणींच्या डोळ्यात आसू

आपला मुलगा, भाऊ, वडील, पती, सासरा, आजोबा असे घरातील लोक आंदोलनाच्या लढ्यात जात असताना त्यांना घरातून औक्षण करण्यात आले होते, तसेच जेवणाचे हाल होत असल्याने महिला, तरुणींनी त्यांना जेवण पाठविले. वाहनातून जेवण जाताना पाहून अनेकांना आश्रू अनावर झाले होते. ज्या महिला जाताना भावनिक झाल्या होत्या त्याच महिलांनी मंगळवारी दुपारनंतर जल्लोष केल्याचे जिल्हाभरात पाहावयास मिळाले.



बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मंगळवारी दुपारनंतर मराठा बांधवांनी गुलाल उधळत फटाके फोडून जल्लोष केला.

बीड । दिव्य न्युज

**मराठा आरक्षणाच्या मागणी संदर्भातील संघर्षाचा अखेर विजयी झाले आहेत. उपाशीपोटी मुंबईला गेलेले बीडचे मराठे विजयाचा गुलाल लावूनच परतत आहेत, अशा शब्दांत आंदोलकांनी आनंद व्यक्त केला. मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर सुरू केलेले आमरण उपोषण आणि त्यांच्या मागण्यांची सरकारने अंमलबजावणी करण्याचे मान्य केल्यानंतर मराठा समाजात उत्साहाचे वातावरण आहे. मंगळवारी दुपारनंतर जिल्हाभरात जल्लोष करण्यात आला.**

सरकारने जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्यची बातमी समजताच बीड जिल्ह्यात जल्लोष सुरू झाला. फटाके फोडून आणि पेढे वाटून कार्यकर्त्यांनी आनंद साजरा केला. जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये तरुण, महिला आणि ज्येष्ठ नागरिक रस्त्यावर उतरले. त्यांनी 'एक मराठा, लाख मराठा'च्या घोषणा देत आनंद साजरा केला. या विजयामुळे मराठा समाजाला आता आरक्षणाचा लाभ घेता येईल. मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या आंदोलनातून सरकारला झुकण्यास भाग पाडले, अशी भावना मराठा समाजात व्यक्त होत आहे. 'संघर्ष केला, यश मिळाले,' असे म्हणत मराठा समाजाने हा विजय साजरा केला. या विजयामुळे आता मराठा समाजाला शैक्षणिक आणि नोकरीच्या संधी उपलब्ध होतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे. जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतल्यानंतर सर्वत्र समाधान व्यक्त केले जात आहे. बीड जिल्ह्यातही हाच आनंद द्विगुणीत झाला आहे.

---

## शासनाची दिशाभूल व दस्तऐवज खाडाखोड प्रकरणात सादिक इनामदार अडचणीत

### वक्फ मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे थेट कारवाईचे आदेश

धारूर । दिव्य न्युज







वक्फ मालमत्तेच्या व्यवहारात शासनाची दिशाभूल आणि दस्तऐवजांमध्ये खाडाखोड करून गंभीर गैरव्यवहार केल्याच्या आरोपांमुळे सादिक बाबामीया इनामदार (भ्रष्टाचार निर्मूलन समिती राष्ट्रीय अध्यक्ष) यांच्यावर कायदेशीर कारवाईचे वारे सुटले आहेत.

दिनांक २२.०७.२०२५ रोजी असद जिलानी कुरेशी यांनी सादर केलेल्या खुलाशात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, वक्फ व्यवहारात लिहून देणारे क्रमांक १ सय्यद मुनिर उर्फ छोटूमिया यांचा सहभाग असूनही, तक्रारदार सादिक इनामदार यांनी जाणूनबुजून त्यांचे नाव दस्तऐवजातून कमी केले. दस्तऐवजात अशा प्रकारे खाडाखोड करून वक्फ मंडळाची दिशाभूल केल्याचा गंभीर ठपका ठेवण्यात आला आहे.

याचबरोबर सादिक इनामदार यांनी असे अनेक बनावट कागदपत्र तयार करून शासन व वक्फ मंडळाला चुकीच्या मार्गावर नेल्याचेही खुलाशात नमूद आहे. विशेष म्हणजे, सदर करारनामा दिनांक ०७.०३.२०१९ रोजीच रद्द करण्यात आलेला असूनदेखील तक्रारदाराकडून तो पुन्हा पुढे आणल्याचे स्पष्ट झाले आहे. या संदर्भात मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका क्रमांक ७९०/२०२५ दाखल असून तक्रार अमान्य करण्याची विनंती केली आहे.

प्रथमदर्शनी तक्रारदार सादिक इनामदार यांनी छेडछाड केलेले दस्तऐवज सादर केल्याचे सिद्ध होत असल्याने, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांच्या विरुद्ध स्वतंत्रपणे कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

---

## काळजातलं काळीज कसं काळजात आटलं माणसानं माणसाला माणसात लुटलं-डॉ. संजय खाडप,

### यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई येथे वांग्मय मंडळाचे उद्घाटन संपन्न

अंबाजोगाई । दिव्य न्युज



येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय मध्ये भाषा विभागाच्या वतीने वांग्मय मंडळ उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला होता. या उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ हे होते. साहित्य माणसाला जगण्याच्या विविध अंगांची ओळख करून देते आणि जगण्याला नवी दिशा मिळते म्हणून तरुणांनी साहित्याकडे वळले पाहिजे, असे प्रतिपादन केले. वांग्मय मंडळाचे प्रमुख उद्घाटन सुप्रसिद्ध कवी माननीय डॉ. संजय खाडप मराठी विभागप्रमुख, वसुंधरा महाविद्यालय घाटनांदुर हे होते. वांग्मय मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत असताना डॉ. संजय खाडप यांनी विविध कवितांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे उद्बोधन केले. संवेदना आणि साहित्य जिवंत राहिले पाहिजे तसेच देशात काय चाललय ,काळे फासुनी अंगाणा घाली, लोकशाही धिंगाणा, ही वास्तववादी कविता विद्यार्थ्यांसमोर ठेवली. विविध कला तरुणांनी विकसित केल्या पाहिजेत कला भाकरीचे साधन बनू शकते, तसेच साहित्य जगण्यासाठी बळ देते, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अहिल्या बरुरे यांनी केले. विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यासाठी मग ते लेखी असो अथवा तोंडी असो वांग्मय मंडळ हे उत्तम व्यासपीठ आहे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी प्रिया कांबळे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार डॉ. अरविंद घोडके सर यांनी मांनले.याप्रसंगी विचार मंचावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रमेश शिंदे, उपप्राचार्य प्रा. स्वप्निल औंढे होते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीच्या वांग्मय मंडळाचे अध्यक्ष वानोळे अनिता, उपाध्यक्ष कांबळे प्रिया , सचिव दुभाषे गायत्री व सदस्य कुलकर्णी वल्लभ, पठाण महेक, गायत्री तुरे, साद दाऊद, खोकले पुण्यरथा आणि रेहान खतीब या पदाधिकारी व सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमास मराठी विभागाचे डॉ.दिलीप भिसे,प्रा.संकेत हंडीबाग,प्रा. बाबासाहेब माने, इंग्रजी विभागाचे प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे, प्रा. गीतांजली माने, प्रा.स्वप्निल राजपंखे, हिंदी विभागाचे डॉ. सुनील शिंदे, प्रा चांदणे, पाली विषयाचे प्रा. देवरे , प्रा. कांबळे यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमांमध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी या विषयांच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या स्वलिखित भित्तिपत्रकांचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---



## चांगल्या माणसाची कधी परीक्षा घेऊ नये-ह.भ.प.राऊत दादा

पिंपळा । दिव्य न्युज

आष्टी तालुक्यातील पिंपळा गावचे उपसरपंच तथा कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मा.रामदास शेंडगे यांचे चुलते व शंकर शेंडगे यांचे वडील कै.नवनाथ आबाजी शेंडगे यांच्या प्रथम पुण्यस्मरण सोहळ्या निमित्त आयोजित कीर्तन सेवा प्रसंगी धर्मभूषण ह.भ.प.राऊत दादा महाराज यांनी कै.नवनाथ तात्या यांच्या जीवनातील अनेक प्रसंगांना उजाळा दिला.तात्या नेहमी शेतीमध्ये काम करायचे हा त्यांचा छंद कायमस्वरूपी स्मरणात राहील.प्रथम पुण्यस्मरण निमित्त संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या गाथेमधील निवडलेल्या अभंग.जन विजन जालें आम्हा । विठ्ठलनामा प्रमाणे ।। पाहे तिकडे मायबाप । विठ्ठल आहे रूखमाई ।। वन पट्टीत एकभाव ।अवघा ठाव सरता जाला ।। आठव नाही सुखदुःखा । नाचे तुका कौतुके ।।भक्तीचे प्रेम प्राप्त झाल्यामुळे जन आणि अरण्य आम्हाला समान भासते जिकडे पाहावे तिकडे आम्हाला विठ्ठल रुक्मिणी दिसते जनात आणि मनात आम्हाला काहीच फरक जाणवत नाही कारण माझे मन देहावर नाही सर्वत्र माझी समदृष्टी झाली आहे.तुकाराम महाराज म्हणतात मी विठ्ठलाच्या नामसकीर्तनामध्ये तन्मय झालो.त्यामुळे मला सुखाने दुःखाची आठवणही राहत नाही.असेही ह.भ.प.राऊत दादा कीर्तनात बोलताना सांगितले मा.उपसभापती गोपाळ भाऊ रक्ताटे श्रद्धांजलीपर म्हणाले तात्या सख्ख्या भावापेक्षाही मला जास्त जीव लाव लावायचे असे बोलताना सांगितले.माजी बीड जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ.शिवाजीराव बोलताना म्हणाले एक मनमिळावू स्वभाव हसत मुख कुठेही भेटल्यानंतर मोठ्या आवाजाने बोलणारे व्यक्तिमत्व म्हणजे तात्या.यावेळी ह.भ.प.नारायण महाराज वाळके.जि.प सदस्य पुणे डॉ.यशवंतराव खताळ.भारतीय जनता पार्टी आष्टी तालुकाध्यक्ष रमेश गावडे.युवा नेते ऋषिकेश दरेकर बीड जिल्हा परिषदेचे सदस्य रामहरी महानोर आदी उपस्थित होते

---

## महादेव गणेश मंडळांनी साकारला पावनखिंडचा देखावा

# देखाव्यातील जिवंतपणा वेधत आहे सर्वांचे लक्ष

दिव्य न्यूज । उमरगा

उमरगा तालुक्यातील रामपुर येथे शौर्य, बलिदान आणि स्वराज्याची गाथा 'पावनखिंड' चा इतिहास जिवंत करणारा देखावा महादेव गणेश मंडळांनी साकारला आहे मंडळाचे अध्यक्ष दिगंबर भोसले, उपध्यक्ष अविनाश भोसले, सचिव किशोर भोसले, खजिनदार तानाजी नांगरे, आदित्य भोसले, दादा जाधव, समर्थ भोसले, अभिषेक भोसले, सुशांत भोसले, मयुर भोसले, शुभम स्वामी ,इत्यादी परिश्रम घेतले आहे.



सगळीकडे श्री गणेश उत्सवाची धामधूम सुरू आहे. यासाठी सर्व गणेश मंडळ वेगवेगळे देखावे उभे करून भक्तगणांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. सार्वजनिक गणेश उत्सवाच्या या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील रामपुर येथे महादेव गणेश मंडळाकडून पावनखिंड हा ऐतिहासिक देखावा उभा केला आहे.

दोन किल्ले उभारून खिंड तयार केली आहे. हा देखावा बघण्यासाठी सर्व गणेश भक्त आणि शिवप्रेमींनी आपली उपस्थिती दर्शवावी असे आवाहन गणेश मंडळांनी केले आहे. महादेव गणेश मंडळ यावर्षी आपल्या गणेशोत्सवात ऐतिहासिक 'पावनखिंड' ही भव्य धीम साकारले आहे. बाजीप्रभू आणि तब्बल ६०० मावळ्यांच्या पराक्रमाची गौरवगाथा म्हणजे 'पावनखिंड विशेष म्हणजे ही थीम सर्व कार्यकत्यांनी स्वतःच्या हाताने आणि परिश्रमातून एकदिलाने तयार केली आहे. कोणत्याही नामवंत कारागिरांची मदत न घेता, मंडळातील तरुणांनी स्वतःच्या हातांनी भव्य देखावा उभा केला आहे. ही एकजूट आणि शौर्य दाखवणारी थीम पाहून गणेश भक्त व शिवप्रेमिना नक्कीच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची आठवण येईल ही केवळ सजावट नाही, तर संस्कार, शौर्य आणि एकात्मतेचा संदेश देणारी व गावातील प्रत्येकाला अभिमान वाटावा अशी कलाकृती नक्कीच ठरेल अशी आशा गणेश मंडळाकडून व्यक्त केली आहे. ग्रामीण भागातील रामपुर येथे महादेव गणेश मंडळाकडून सलग ४७ वर्ष राबविण्यात आलेल्या समाजोपयोगी उपक्रम, नियोजनबद्ध घेण्यात आलेल्या धार्मिक, सामाजिक व प्रबोधन आशा आदर्शवत मंडळ गेले ४७ वर्षांपासून रामपुर येथे महादेव गणेश मंडळाकडून विविध उपक्रम माध्यमातून राबविण्यात येत आहेत. यावेळी मंडळाचे सदस्य गणपंत जाधव, ज्ञानेश्वर भोसले, गणेश भोसले, महादेव भोसले,किसन दासमे, कार्तिक भालेकरी, गोविंद गायकवाड, वैभव पाटील, विष्णु पाटील, अतुल भोसले, शाहुराज दासमे,प्रणव गायकवाड, पांडुरंग जाधव, मच्छिंद्र गवळी, अमीन शेख, विनोद भोसले, शुभम गुळे, प्रशांत भोसले ज्योतीबा दासमे आदी उपस्थित होते.

---

### वीज खांबावर चढणारे लाइनमन सुरक्षित किती ?





वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर 'फॉल्ट' शोधण्यासह सुरळीत वीज देण्यासाठी महावितरणचे लाइनमन २४ तास कार्यरत असतात. छाया : संतोष राजपूत





#### सुरक्षा साधने किती ?

शहरातील विद्युत व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी प्रत्यक्ष फिल्डवर काम करणाऱ्या लाइनमनची सुरक्षिता किती आहे? हे अनेकदा लाइनमन काम करताना दिसून येते. कधी त्रुटी आढळतात तर कधी परिपूर्णतेने लाइनमन कामासाठी हजर असतात. टेस्टर, पक्कड, रबरी हातमोजे, गम बूट, वीज वाहिनीतील दोष शोधण्यासाठी वापराचे उपकरण डिस्चार्ज रॉड, झुला आदी साहित्य लाइनमन यांना मिळते का? याचा वापर होतो का? हे पाहणे गरजेचे आहे. अपघात घडल्यास जबाबदार कोण? असा प्रश्न आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०